## नगर परिषद,मलकापूर जि.बुलढाणा
## दि.30/8/2021 स्थायी समिती कार्यवृत्त

मलकापूर नगर परिषदेची स्थायी समिती सभा मा.अध्यक्ष,नगर परिषद,मलकापूर यांची नोटीस क्रं.नपम/अध्यक्ष/सभा/1801/2021 दि.23/8/2021 नुसार आज दि.30/8/2021 ला बोलविण्यात आली.सभेसाठी आवश्यक गणपूर्ती झाल्यावर न.प.अध्यक्ष मा.हरीश महादेवसिंह रावळ यांची तब्येत बरी नसल्याने न.प.चे उपाध्यक्ष श्री.रशिदखाँ युसूफखाँ जमादार यांचे अध्यक्षते खाली सभेचे कामकाज चालविण्याचे निश्चित करण्यात आले. मा.सभापती यांनी सभेची आवश्यक गणपर्ती झाल्याने सभेचे कामकाज सुरु करण्याचे निर्देश दिले त्यानुसार सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

1. **शिक्षण समितीची सभा दिनांक 22/06/2021 ला झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता देणे.**

**शिक्षण समितीची सभा दिनांक 22/06/2021 चे कार्यावृत्त व सभेची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली**

**ठरविण्यात येते की,** न.प.शिक्षण समिती सभा दिनांक 22/06/2021 ला झाली असून सभेत वेळेवरचा एकही विषय नसून सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सूचक-राजेंद्र वसंतराव वाडेकर**

**अनुमोदक-अनिल शिवरत्तन गांधी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

2. **दै.देशदुत दिनांक 19 मे 2021 मध्ये प्रसिध्द निविदा सुचनेनुसार प्राप्त विविध निविदा/दरपत्रके यांना मान्यता देणे.**

**दै.देशदुत दिनांक 19 मे 2021 मध्ये प्रसिध्द निविदा सुचनेनुसार प्राप्त विविध निविदा/दरपत्रके यांना मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली**

ठरविण्यात येते की,नगर परिषद मलकापूर अंतर्गत विविध कामे/सेवांसाठी दै.देशदुत दिनांक19 मे 2021 रोजी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.त्यानुसार दि.27/05/2021 ही निविदा / दरपत्रकेसादर करावयाची अंतीम तारीख होती.सदर मुदतीमध्ये प्राप्त निविदा/दरपत्रके यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1. न.प.रुग्णवाहिकेसाठी तात्पुरत्या स्वरुपात चालक सुविधा उपलब्ध करुन देणे.

न.प.रुग्णवाहिकेस कायमस्वरुपी चालविणेबाबत मा.सर्वसाधारण सभेकडून निकष स्पष्टपणे निश्चित होवून त्याबाबत संपूर्ण कार्यवाही होईपर्यत समक्ष प्राधिकरणाच्या मान्यतेस अधीन राहून नगर परिषदेस प्राप्त रुग्णवाहिकेसाठी तात्पुरत्या स्वरुपात चालक ठेवणेसाठी निर्वीदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार खालीलप्रमाणे दराने काम करण्यास लोक इच्छुक असून त्यांच्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | चालकाचे नांव | प्राप्त दर(प्रतिमाह) |
|---|---|---|
| 1 | गणेश मधूकर टिकार | 12,000/- |
| 2 | प्रमोद सुखदेव राखुंडे | 10,500/- |
| 3 | रमेश मधुकर टिकार | 13,000/- |

तरी वरील पैकी श्री प्रमोद सुखदेव राखुंडे यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचे दरास व येणारा खर्च न.प.फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

2 नगर परिषदेच्या सार्वजनिक शौचालयासाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे.



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

नगर परिषदेच्या सार्वजनिक शौचालयामध्ये नियमीतपणे लागणारे विविध साहित्य खरेदी करण्यासाठी विविध प्रकारचे वस्तू क्र.1 ते 10 खरेदी करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते.याकरीता खालील प्रमाणे पुरवठादारांनी दरपत्रक सादर केले आहे.

1. महालक्ष्मी जनरल स्टोअर्स
2. श्रीकृपा एन्टरप्रायजेस अँड जनरल
3. वैष्णवी जनरल स्टोअर्स

वरील पैकी श्री.कृपा एन्टरप्रायजेस अँड जनरल यांचे दर सर्वात कमी असल्याने कमी दराच्या निविदेस ही सभा मंजूरात देत आहे

3. मोकाट जनावरे कुत्र इ.पकडणेसाठी न.प.च्या ट्रॉलीमध्ये आवश्यक ते बदल करुन निर्देशाप्रमाणे तयार करणे.

सदर कामासाठी 3 पात्र कंत्राटदार न मिळाल्याने सदर निविदा रद्द करण्यासाठी व फेर निवीदा करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

4. न.प.मलकापूर अंतर्गत झाडे ट्रि-गार्डसह लावणे.

नगर परिषद मलकापूर अंतर्गत न.प.हद्दीमध्ये विविध ठिकाणी सौंदर्यीकरणासाठी देखाव्याची झाडे-झुडपे लावणे.फलझाडे लावणे.भारतीय जातीची मोठया झाडांची रोपे लावणे व आवश्यक तेथे ट्रि-गार्ड लावणे तसेच सदर सर्व बाबींचा आवश्यकतेप्रमाणे पुरवठा करणे लावलेल्या झाडांना पाणी देणे.अशा सर्व बाबींसाठी दरपत्रके मागविण्यात आली होती.तरी विहित मुदतीमध्ये खालील प्रमाणे व्यक्ती/संस्थाची दरपत्रके प्राप्त झाली आहे.

1. मुश्ताकखान जब्बारखान
2. वाजीद कादरी
3. जाहेद अहमद अ.सत्तार

वरील पैकी मुश्ताकखान जब्बारखान यांचे दर सर्वात कमी असल्याने कमी दराच्या निविदेस ही सभा मंजूरात देत आहे.

5. मलकापूर शहरासाठी स्वच्छता संबधी तक्रारीसाठी वेब ॲपलीकेशन तयार करणे व सन 2021-2020 करीता देखभाल करणे.

सदर कामासाठी 3 पात्र कंत्राटदार प्राप्त न झाल्याने सदर निविदा रद्द करुन फेर निवीदा करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरात देत आहे

दै.देशदुत दिनांक 19 मे 2021 मध्ये प्रसिध्द निविदा सुचनेनुसार वरील 1 ते 5 चे कमी दराच्या निविदेस व येणाऱ्या खर्चास व या करिता येणारा खर्च न.प.फंडातून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक-मो.जाकीर मो.ईलियास

अनुमोदक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

3. **नगर परिषद कार्यालयात INVERTER व बॅटरीज बसविणे करीता दिनांक 23/07/2021 रोजी कार्यालयाचे नोटीस बोर्डवरील जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त दरपत्रकास मान्यता देणे.**

नगर परिषद कार्यालयात INVERTER व बॅटरीज बसविणे करीता दिनांक 23/07/2021 रोजी कार्यालयाचे नोटीस बोर्डवरील जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त दरपत्रकास मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

ठरविण्यात येते की,देशात,महाराष्ट्र तसेच मलकापूर शहरात कोरोना चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाने प्रत्यक्ष बैठका न घेता ऑनलाईनपध्दतीने गुगलमिट/झुम मिटींग ऍपद्वारे सभा घेणेबाबत आदेशीत केले आहे.या बैठका सुरु असतांना विज प्रवाह खंडीत झाल्यास अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच प्रशासकीय कामकाज ही प्रभावीत होत आहे. याकरीता मुख्याधिकारी यांचे दालनात इनव्हर्टर असणे अंत्यत आवश्यक झाले आहे.याकरीता सुधारीत खरेदी धोरण दिनांक 01/12/2016 नुसार खुल्याबाजारातून दरपत्रक मागविण्याबाबत दिनांक 23/07/2021 रोजी सुचना नोटीस बोर्डवर लावण्यात आली होती.त्यानुसार दिनांक 27/07/2021 पर्यत विहीत मुदतीत 3 दरपत्रक प्राप्त झाले आहे.ते खालील प्रमाणे

| अ.क्र. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त एकूण दर |
|---|---|---|
| 1 | निंबा बॅटरीज,मलकापूर | 40,000/- |
| 2 | श्रावणी एंटरप्रायजेस,मलकापूर | 52,000/- |
| 3 | पवन इर्स्टुमेंटेशन अँड ईंजि.अकोला | 42,000/- |

वरील दरपत्रकांचा तुलनात्मक अहवाल तयार करण्यात आलेला असुन त्यानुसार निंबा बॅटरीज मलकापूर यांचे दर सर्वात कमी आहेत.तरी सर्वात कमी दराच्या निवीदेस व येणाऱ्या खर्चास व सदरचा खर्च न.प.फंडातून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक- राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक-अनिल शिवरतन गांधी

ठराव सर्वानुमते मंजूर

4. **सन 2021-2022 करीता श्रीगणेश विसर्जनासाठी फिरते जलकुंभ तयार करणे करीता दै.खबरे शामतक दिनांक 07/04/2021 मध्ये प्रसिध्द निविदा सुचनेनुसार प्राप्त दरपत्रकांना मान्यता देणे.**

सन 2021-2022 करीता श्रीगणेश विसर्जनासाठी फिरते जलकुंभ तयार करणे करीता दै.खबरे शामतक मध्ये प्रसिध्द निविदा सुचनेनुसार प्राप्त दरपत्रकांना मान्यता देणेंचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,सार्वजनिक गणेशोत्सवा दरम्यान कृत्रीम मोबाईल जलकुंभ करुन गणेश मुर्तीचे विसर्जन करण्याकरीता दर मागविण्यासाठी दै.खबरे शामतक दिनांक 07/04/2021 मध्ये प्रसिध्द निविदा सुचनेनुसार एकही निवीदा प्राप्त न झाल्याने सदर निवीदा सुचनेस मुदतवाढ देवुन दि.24/04/2021 रोजी दै.खबरे शामतक मध्ये मुदवाढ सुचना देवून दि.26/04/2021 पर्यत मुदत वाढ देण्यात आली होती.त्यानुसार सदर मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या निवीदांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | पिकअप गाडी | टेम्पो/DCM |
|---|---|---|---|
| 1 | अक्षय राजकुमार भंसाली | 9000/- | 21500/- |
| 2 | अविनाश गोपाल जामोदे | 8000/- | 20000/- |
| 3 | प्रसाद गायकवाड | 9250/- | 23800/- |

वरील पैकी श्री.अविनाश गोपाल जामोदे यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांची कमी दराच्या निविदेस याकरिता येणाऱ्या खर्चास व सदरचा खर्च न.प.निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक-अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक-मो.जाकीर मो.ईलियास

ठराव सर्वानुमते मंजूर



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

5. **शहरातील मुख्य रस्ते सफाईसाठी ट्रॅक्टर अॅटच्ड रोड स्विपींग मशीन घेणे करीता खुल्या बाजारातून मागविण्यात आलेल्या दरपत्रकास मान्यता देणे.**

शहरातील मुख्य रस्ते सफाईसाठी ट्रॅक्टर अॅटच्ड रोड स्विपींग मशीन घेणे करीता खुल्या बाजारातून मागविण्यात आलेल्या दरपत्रकास मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेत आरोग्य सभापती मो.जाकीर मो.ईलियास,श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सहभाग घेतला

ठरविण्यात येते की, चर्चेत सहभागी होतांना आरोग्य सभापती यांनी शहरातील मुख्य रस्त्यावरील धुळ व कचरा साफ करणेसाठी ट्रॅक्टर अटॅच्ड रोड स्विपींग मशीन चा डेमो घेण्यात यावा तसेच श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर यांनी सुध्दा सदर मशिनाचा डेमो सन्माननीय न.प.सदस्यासमोर घेण्यात यावा असे सभेत सुचित केले. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.23 दिनांक 10/12/2019 नुसार शहरातील मुख्य रस्त्यावरील धुळ व कचरा साफ करणेसाठी ट्रॅक्टर अटॅच्ड रोड स्विपींग मशीन खरेदी करणे व सदर काम 14 वा वित्त आयोग निधीतून करण्यास प्रशासकीय मंजूरात देण्यात आलेली आहे.यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खुल्या बाजारातून ट्रॅक्टर अटॅच्ड रोड स्विपींग मशीनचे दरपत्रक मागविण्यात आले होते.

यानुसार विहीत मुदतीत दरपत्रक प्राप्त झाले आहे.ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | दरपत्रकांची किंमत |
|---|---|---|
| 1 | के.पी.एंटरप्रायजेस,पुणे | 7,61,100/- |
| 2 | फ्लेक्स ओ क्लीन,पुणे | 7,53,430/- |
| 3 | एस.एस.इंजिनियर्स,पुणे | 7,25,700/- |

वरीलपैकी एस.एस.इंजिनियर्स,पुणे यांचे दर सर्वात कमी असून सदर दरपत्रकास व येणाऱ्या खर्चास तसेच सदरचा खर्च 14 वा वित्त आयोग निधीतून करण्यास तसेच सदस्यांसमोर सदर मशिनाचा डेमो घेण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक- राजेंद्र वसंतराव वाडेकर
अनुमोदक-मो.जाकीर मो.ईलियास

ठराव सर्वानुमते मंजूर

6. **दै.सायरन दिनांक 13/08/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार मलकापूर न.प.हद्दीतील सार्वजनिक उदयानमध्ये ओपन जिमचे साहित्य व लहान मुलांन करीता खेळणे बसविण्याच्या कामाकरीता आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणे.**

दै.सायरन दिनांक 13/08/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार मलकापूर न.प.हद्दीतील सार्वजनिक उदयानमध्ये ओपन जिमचे साहित्य व लहान मुलांन करीता खेळणे बसविण्याच्या कामाकरीता आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणेचे प्रकरण व सभेची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.4 दिनांक 4/6/2018 नुसार नगर परिषदेच्या सार्वजनिक उद्यानाचे सौदर्यीकरण करणे (लहान मुलांकरीता खेळणे साहित्य बसविणे,ओपन जिमचे साहित्य अद्यायावत शेड उभारणे) सदरचे काम वैशीष्टयपूर्ण योजने अंतर्गत पारपेठ पुलाकरीता राखीव निधी वगळता उर्वरीत निधीमधुन उतरत्या क्रमाने काम करण्यास सभेने मंजूरात प्रदान केली

आहे.त्यानुसार स्वप्नपूर्ती कन्सलटंट यांचेकडुन आराखडे तयार करुन घेण्यात आले व त्या आराखडयांना मा.सहाय्यक संचालक,नगर रचना विभाग बुलडाणा यांचेकडे पाठवावे लागेल असे नगर अभियंता यांचे टिप्पणीत नमुद केले आहे.पुढील कार्यालयीन टिप्पणीत मध्ये सदरचे कामामध्ये ओपन जिमचे साहित्य बसवावयाचे असल्याने सदरच्या साहित्याचे दर हे S.S.R. 2020-2021 (राज्य दरसुची मध्ये अंतर्भुत नसल्याने न.प. ला आवश्यक असलेल्या ओपन जिमच्या साहित्याचे दरपत्रक मागवावे लागतील जेणे करुन अंदाजपत्रक तयार करतांना प्राप्त दर उपयोगी येतील सदर दरपत्रक तयार करुन प्रसिध्दीसाठी तयार करुन सादर करण्यात आले.

दै.सायरन दिनांक 13/08/2021 मध्ये दिनांक 18/08/2021 पर्यंत दरपत्रक प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.दरपत्रक प्रसिध्दीनंतर विहीत मुदतीत 3 दरपत्रक प्राप्त झाले असून त्याचे विवरण तयार करण्यात आले.ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | Pariculars Items | Qty | दिपेश फॅब्रिकेटर्स | एस.जी इंटरप्राजेस | गवाडा स्पोट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Air Walker | 1 | 1,00,800/- | 1,23,944/- | 1,16928/- |
| 2 | Chest Press Double | 1 | 1,18,000/- | 1,45,093/- | 1.36.880/- |
| 3 | Leg Press Double | 1 | 1,16000/- | 1,42634/- | 1,34,560/- |
| 4 | Sit Up Board | 1 | 69,000/- | 84,842/- | 80,040/- |
| 5 | Rower | 1 | 97,000/- | 1,19,271/- | 1,12,520/- |
| 6 | Multi Runctional Trainer | 1 | 1,09,000/- | 1,34,026/- | 1,26,440/- |
| 7 | Sky Walkar | 1 | 1.59,000/- | 1,95,506/- | 1,84,440/- |
| 8 | Standing and Seating twister | 1 | 97,000/- | 1,19,271/- | 1,12,520/- |
| 9 | Shoulder Builder | 1 | 92,000/- | 1,13,123/- | 1,06,720/- |
| 10 | Surf Board | 1 | 98,000/- | 1,20,501/- | 1,13,680/- |
| 11 | Exer Cycle | 1 | 77,200/- | 94,925/- | 89,552/- |
| 12 | Double Bar | 1 | 72,000/- | 88,531/- | 83,520/- |
| 13 | Money Ladder | 1 | 1,09,000/- | 1,34,026/- | 1,26,440/- |
| 14 | Push up Bar | 1 | 66,000/- | 81,154/- | 76,560/- |
| 15 | Bench With Fixed Weights | 1 | 69,000/- | 84,842/- | 80,040/- |
| 16 | Seated Puller | 1 | 1,23,000/- | 1,51,241/- | 1,42,680/- |
| 17 | Shoulder Exerise Spinner | 1 | 92,000/- | 1,13,123/- | 1,06,720/- |
| 18 | Hyper Extension | 1 | 59,000/- | 72,546/- | 68,440/- |
| 19 | Installation Charges of each Equpment | - | - | 4,910/- | 4,500/- |
| | Total | | 17,23,000.00 | 21,23,509.00 | 20,03,180.00 |

वरील प्राप्त दरापैकी सर्वात कमी दर अनु.1 दिपेश फॅब्रिकेटर्स यांचे असल्याचे लेखापाल,लेखा परिक्षक व नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी अहवालात नमुद केले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेवून अनु क्रं.1 दिपेश फॅब्रिकेटर्स यांचे कमी दराच्या निविदेस व येणाऱ्या खर्चास तसेच सदरचा खर्च वैशिष्टयपूर्ण निधी/ न.प.निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

सूचक-अनिल शिवरतन गांधी
अनुमोदक-राजेंद्र बसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

7. **दै.देशोन्नती दिनांक 29/07/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार न.प.निधी अंतर्गत विविध ठिकाणी गतिरोधक बसविण्यास आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणे.**

दै.देशोन्नती दिनांक 29/07/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार न.प.निधी अंतर्गत विविध ठिकाणी गतिरोधक बसविण्यास आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमारे सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की.नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.17 दिनांक 08/03/2021 नुसार शहरात विविध ठिकाणी गतिरोधक बसविण्यासाठी दरपत्रक मागविण्यास व येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता सभेने प्रदान केली आहे.शहरात गतिरोधक बसविण्यासाठी जिल्हासुरक्षा समितीकडे रितसर परवानगीनेच गतिरोधक बसविण्याची कार्यवाही करण्यास तसेच सदरचे काम न.प.निधी / रस्ता अनुदान यामधून करण्यास सभेने मंजूरात प्रदान केली आहे.त्यानुसारन.प.हद्दीमध्ये विविध ठिकाणी काँक्रीट,डांबरी,प्लास्टीकचे गतीरोधक बसविणे आवश्यक असून त्याचे प्रति मिटर प्रमाणे दर मागविणे उचित राहील.त्याकरीता कोटेशन तयार करण्यात आले होते. दै.देशोन्नती दिनांक 29/07/2021 च्या अंकात सदर कामाकरीता कोटेशन नोटीस प्रसिध्द करण्यात आली असून मुदतीत निवीदा प्राप्त झाल्या आहे.मुदत दिनांक 09/08/2021 कार्यालयीन वेळेपर्यंत ठेवण्यात आली होती .प्राप्त निवीदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे.तो खालील प्रमाणे आहे.

| **कामाचे नांव :- नगर परिषद अंतर्गत विविध ठिकाणी गतिरोधक बसविणे** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | **दरपत्रकामध्ये नमूद केलेले प्रति मीटर GST सह दर** | | |
| | | **डांबरी गतिरोधक बसविणे** | **काँक्रीट गतिरोधक बसविणे** | **रबर मोल्डेड गतिरोधक बसविणे** |
| 1 | काद्री ख्वाजा वाजीद मोईनउल्ला | 2600/- | 3350/- | 4600/- |
| 2 | मुश्ताक खान जब्बार खान | 2500/- | 3250/- | 4500/- |
| 3 | रझाउल्ला खान | 2750/- | 3500/- | 4875/- |

वरील प्राप्त दरापैकी सर्वात कमी दर अनु.क्र.2 मुश्ताकखान जब्बारखान यांचे असल्याचे लेखापाल,लेखा परिक्षक व नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी अहवालानुसार अनु क्रं.2 मुश्ताकखान जब्बारखान यांचे कमी दराच्या निविदेस व येणाऱ्या खर्चास तसेच सदर चा खर्च न.प.फंडातून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक- मो.जाकीर मो.ईलियास
अनुमोदक- सनाउल्लाखाँ रफिउल्लाखाँ

ठराव सर्वानुमते मंजूर

8. **दै.खबरे शामतक दिनांक 07/04/2021 मध्ये प्रसिध्द निवीदा सुचनेनुसार न.प.निधी अंतर्गत गणेशोत्स,दुर्गा उत्सव व इतर धार्मिक उत्सवाच्या वेळी रहदारी ब्लॉक करण्याकरीता बेरेकेटींग,कापडी कनात बांधण्याकरीता आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणे.**

दै.खबरे शामतक दिनांक07/04/2021 मध्ये प्रसिध्द निवीदा सुचनेनुसार न.प.निधी अंतर्गत गणेशोत्स,दुर्गा उत्सव व इतर धार्मिक उत्सवाच्या वेळी रहदारी ब्लॉक करण्याकरीता बेरेकेटींग,कापडी कनात



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

बांधण्याकरीता आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली.त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेत श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर श्री.अनिल शिवरतन गांधी यांनी सहभाग घेतला

ठरविण्यात येते की,नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.16 दिनांक 08/03/2021 नुसार सन 2021-2022 करीता गणेश उत्सव,दुर्गा उत्सव व इतर उत्सवाकरीता न.प.मार्फत कराव्या लागणाऱ्या उपाय योजना करीता जसे बॅरेकेटींग,कनात बांधणे,रस्ते दुरुस्ती,C.C.T.V.व्हीडीओ कॅमेरा याकरीता वार्षीक दर मागविण्यास सभेने मंजूरात प्रदान केली आहे.त्यानुसार दै.खबरे शामतक दिनांक 07/04/2021 मध्ये दिनांक 22/04/2021 पर्यंत प्रसिध्द करण्यात आली आहे.

विहीत मुदतीत एकही निवीदा प्राप्त न झाल्यामुळे सदर कामासाठी दिनांक 26/04/2021 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत नगर अभियंता यांचे अहवालात नमुद केले आहे.त्यानुसार विहीत मुदतीत तिन निवीदा प्राप्त झाल्या असून त्यांचे विवरण सादर केले आहे. प्राप्त दरांचा तुलनात्मक अहवाल खालील प्रमाणे सादर केले आहे.

| कामाचे नाव :- गणेशोत्सव,दुर्गोत्सव आणि इतर धार्मिक उत्सवाच्या वेळी आवश्यक ठिकाणी कापडी कनात/पडदा बांधणे सोडणे वाहतुकीच्या खर्चासह | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र** | **कंत्राटदाराचे नांव** | **दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर** | | | |
| | | **गणेशोत्सव** | **दुर्गोत्सव** | **शिवजयंती** | **पैगंबर जयंती** |
| 1 | विजयकुमार सालवाणी | 39,000/- | 12,000/- | 36000/- | 6700/- |
| 2 | मुश्ताक खान जब्बार खान | 35,000/- | 11,000/- | 35,000/- | 5,000/- |
| 3 | वाजीदउल्लाह कादरी | 40,000/- | 14,000/- | 38,000/- | 7,000/- |

वरील प्राप्त दरांपैकी सर्वात कमी दर अनु क्र.2 मुश्ताकखान जब्बारखान यांचे असल्याबाबतचा अहवाल लेखापाल,लेखापरिक्षक व नगर अभियंता यांनी सादर केला आहे.चर्चेत सहभागी श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर व श्री.अनिल शिवरतन गांधी यांनी सभेचे निदर्शनास आणून दिले की, सदरचा खर्च दर वर्षी नगर परिषदेला करावा लागत असल्याने बॅरेकेटींग नगर परिषदेने स्वत तयार करुन घेतल्यास याचा उपयोग नगर परिषदेला दरवर्षी करता येईल जेणेकरुन न.प.चा खर्च कमी होईल मा.मुख्याधिकारी यांनी या करिता येणारा खर्च व भाडयाने घेण्याचा खर्च याचा विचार घेवून कार्यवाही करावी लागेल त्यावर संबंधित सदस्यांचे समाधान झाले वरील प्राप्त दरांपैकी सर्वात कमी दर अनु क्र.2 मुश्ताकखान जब्बारखान यांचे निविदेस व येणाऱ्या खर्चास व सदरचे काम न.प.निधीतून करण्यास तसेच न.प.मालकीचेआवश्यक बॅरेकेटींग साठी किती खर्च येईल याचा अभ्यास करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक-मो.जाकीर मो.ईलियास

अनुमोदक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

9. **दै.लोकशाही दिनांक 08/12/2020 च्या अंकात न.प.निधी अंतर्गत झालेल्या एका कामाना मान्यता देणे.**



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

दै.लोकशाही दिनांक 08/12/2020 च्या अंकात न.प.निधी अंतर्गत झालेल्या एका कामाना मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,नगर परिषद निधी अंतर्गत हमीद जमादार यांचे घरापासून ते फिरोज ठेकेदार यांचे घरापर्यंत कॉंक्रीट टाकून पेव्हींग ब्लॉक बसविणे व एका बाजूने नाली बांधकाम करणेबाबत व ढापा टाकणेबाबत(अंदाजपत्रकीय रक्कम रु.4,22,586/-) खालील प्रमाणे निवीदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | % दर |
|---|---|---|
| 1 | कादृी ख्वाजा वाजीद मोईनउल्लाह | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.81% जास्त दराने |
| 2 | राजेश अरुण सुसारे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.27% जास्त दराने |
| 3 | मुश्ताक खान जब्बार खान | अंदाजपत्रकीय दराने |
| 4 | सय्यद हकीम सय्यद शमीम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.00% कमी दराने |

वरील प्राप्त दरापैकी सर्वात कमी दर अनु क्र.4 सय्यद हकीम सय्यद शमीम यांनी टेन्डर आयडी 2020-62655L6 प्रमाणे 6% कमी दराची निवीदा भरली होती.त्यामुळे त्यांना शासन निर्णय क्र.29/07/2018 प्रमाणे 10% पर्यत अतिरीक्त सुरक्षा रक्कम 1% प्रमाणे रु.4225/- भरणाबाबत न.प.चे पत्र क्र.नपम/मुअ/बांध/6344/2021 दिनांक 02/02/2021 ला पत्र देण्यात आले होते.परंतू कंत्राटदार सय्यद हकीम सय्यद शमीम रा.देऊळघाट यांनी (L1) 1% अतिरीक्त सुरक्षा रक्कमेचा भरणा केला नसल्याने (L2) यांना 1% अतिरीक्त सुरक्षा रक्कमेचा भरणा करण्याकरीता व काम 6% कमी दराने करण्याकरीता (L2) मुश्ताकखान जब्बारखान यांना न.प.चे पत्र क्र.नपम/मुअ/बांधकाम/1113/2021 दिनांक 24/06/2021 नुसार कळविण्यात आले.त्यांनी दि.24/06/2021 पत्र क्र.2273 नुसार 6% कमी दराने काम करणेस इच्छूक असलेबाबत कळविले व पावती क्र.1/866 दि.24/06/2021 रु.4225/- नुसार भरणा केला असल्योन सदरच्या कामासाठी (L1) सैय्यद हकीम सै.करीम रा.देऊळघाट यांची बयाणा रक्कम 1% जप्त करुन (L2) श्री मुश्ताकखान जब्बार खान यांची कमी दराची निवीदा मंजूर करण्यास व या करिता येणाऱ्या खर्चास व सदरचे काम न.प.निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक-सनाउल्लाखॉं रफीउल्लाखॉं

अनुमोदक-मो.जाकीर मो.ईलियास

ठराव सर्वानुमते मंजूर

**10. दै.विदर्भ मतदार दिनांक 17/2/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या 14 व्या वित्त आयोगा अंतर्गत एका कामाला मान्यता देणे.**

दै.विदर्भ मतदार दिनांक 17/2/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या 14 व्या वित्त आयोगा अंतर्गत एका कामाला मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.65 दिनांक 23/06/2017 ठराव क्र.46 दिनांक 31/08/2017 नुसार सभेने (1) प्र.क्र.10 छोटा उपासरा ते दिगंबर जैन ते वसंतराव जाधव यांचे घर ते विनोद निरखेसाहेब यांचे घरापर्यत अंडरग्राऊंड कॉंक्रीट नालीसह पेव्हींग ब्लॉक बसविणे.(2) श्री.भगवान वाघ ते राजू जैन यांच्या घरापर्यत सार्व नाली कॉंक्रीट रोड करणे.(3) बशीरखान बागवान यांचे घरापासून गांधी चौकाच्या कोपऱ्यापर्यत असलेल्या दर्गापर्यत कॉंक्रीट रोड करणे या कामांना मंजूरी प्रदान केली आहे.सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन मा.कार्यकारी अभियंता यांचेकडे तांत्रीक मंजूराती करीता



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

पाठविण्यात आली होती.त्यानुसार मा.कार्यकारी अभियंता म.जी.प्रा.बुलडाणा यांचे पत्र क्र.रेचिशा/1173/2020 दि.03/06/2020 नुसार तांत्रीक मंजूरात प्रदान केलेली आहे.सदर कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूराती करीता मा.जिल्हाधिकारी,बुलडाणा यांचेकडे सादर करण्यात आला होता.यावर मा.जिल्हाधिकारी,बुलडाणा यांचे पत्र क्र.388/नविशा/डेक्स-2/2021 दिनांक 15/02/2021 व पत्र क्र.386/नविशा/डेक्स-2/2021 दिनांक 15/02/2021 नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याने सदर कामांची ई-निवीदा दै.विदर्भ मतदार,बुलडाणा या आवृत्ती पेपरमध्ये प्रसिध्द करण्यात आली असून दिनांक 17/02/2021 च्या अंकात प्रसिध्द झाली असून विहीत मुदतीत निविदा प्राप्त झाल्या आहे.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**प्र.क्र.10 मधील भगवान वाघ टीआर राजू जैन यांचे घरापर्यंत सार्वजनिक नाली व कॉंक्रीट रोड करणे.**

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | %दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | एम.जाहेद अहमद सलाम शेख | अंदाजपत्रकाच्या -0.31% कमी दराने | होय |
| 2 | एबीएस सिमेंट इ.कंपनी | अंदाजपत्रकाच्या 1.26 % जास्त दराने | होय |
| 3 | मॅक्रो-को.इन्फ्रा.प्रा.लिमीटेड | अंदाजपत्रकाच्या 2.16 % जास्त दराने | होय |
| 4 | ताहेर मा.लहेरी | अंदाजपत्रकीय दराने | होय |

वरील प्राप्त दरापैकी सर्वात कमी दर अनु.क्र.1 एम.जाहेद अहमद सलाम शेख यांचे असल्याबाबत लेखापाल,लेखापरिक्षक व नगर अभियंता यांनी सादर केलेला आहे.तरी कमी दराच्या निविदेस व या करिता येणाऱ्या खर्चास तसेच सदरचे काम 14 व्या वित्त आयोग निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक-अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक-मो.जाकीर मो.ईलियास

टराव सर्वानुमते मंजूर

11. **पाणी पुरवठा विभागातील दैनिक देशदुत,दै.हिंदुस्थान,व वादळातील नौका सारखा समाज या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या निविदांना मान्यता देणे.**

पाणी पुरवठा विभागातील दैनिक देशदुत,दै.हिंदुस्थान,व वादळातील नौका सारखा समाज या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या निविदांना मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनिल शिवरतन गांधी यांनी सभेचे निदर्शनास आणले की **काम क्र. 2 मध्ये** बजाज जनरल स्टोअर्स यांच्याकडून 100 बॅग पीएसी पावडर व 30 टन तुरटी पुरवठा आदेश देवून मागविण्यात आले आहे परंतु टिप्पणीत 30 टन तुरटीचा उल्लेख नाही.पाणी पुरवठा अभियंता यांची बदली झाली असल्याने 30 टन तुरटीचा समावेश कार्यवृत्त करावी अशी सभापती कडे मागणी केली व सभेने त्यास मान्यता दिली.

ठरविण्यात येते की,दिनांक 22/05/2021 च्या दैनिक देशदुत वृत्तपत्रात पाणी पुरवठा विभागाकरीता ब्लीचींग,तुरटी,कुशल-अकुशल कामगार पुरवठा करणेबाबत करीता निविदा सुचना मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार मुदतीत प्राप्त झालेल्या निवीदांचा तुलनात्मक अहवाल तयार करण्यात आलेला आहे.त्या खालील प्रमाणे आहे.

**काम क्र. 1 :- सन 2021-2022 या आर्थीक वर्षाकरीता मलकापूर पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दी करण केंद्राकरीता ब्लिचींग पावडर पुरविणे.(33% क्लोरीनयुक्त)**

| अ.क्र. | ई-निवीदा सादर करणाऱ्यांचे नाव | ई-निवीदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | पार्श्व पॉलीमेर असोसिएटस,नागपुर | 795.00 प्रति 25 KG बॅग |



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

2. डॉल्फीन केमिकल्स,जळगाव 899.00 प्रति 25 KG बॅग

3. बजाज जनरल स्टोअर्स चंद्रपूर 730.00 प्रति 25 KG बॅग

यामध्ये सर्वात कमी दर **बजाज जनरल स्टोअर्स चंद्रपुर** यांचे प्रति बॅग 730.00 प्रमाणे आहे.निवीदा उघडल्यानंतर कामाची निकड लक्षात घेता,मा.अध्यक्ष महोदय यांच्या दिनांक 09/06/2021 च्या कार्यात्तर मंजूरीच्या आदेशानुसार बजाज जनरल स्टोअर्स चंद्रपुर यांच्या 280 बॅग ब्लिचींग पुरवठा आदेश देऊन मागविण्यात आले आहे.सदर कार्यात्तर मंजूरीने केलेल्या खरेदी व बजाज जनरल स्टोअर्स,चंद्रपूर यांच्या निवीदेस ही सभा मान्यता देत आहे.

**काम क्र. 2 :- मलकापूर पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्राकरीता(प्रति टन)तुरटी पुरविणे.**(15 ते 16% **फेरीक ॲलम) व पीएसी पावडर पुरवठा करणे.**(प्रति 25 किलो बॅग)

| अ. क्र. | ई-निवीदा सादर करणाऱ्यांचे नाव | तुरटी पुरवठयाकरीता सादर केलेले दर (प्रति टन प्रमाणे) | पीएसी पावडर करीता सादर केलेले दर प्रति बॅग 25 किलो प्रमाणे |
|---|---|---|---|
| 1 | डॉल्फीन केमिकल्स,जळगाव | 6299 प्रति टन | 1199/- |
| 2 | **बजाज जनरल स्टोअर्स चंद्रपूर** | **8215 प्रति टन** | 779/- |
| 3 | पार्श्व असोसिएटस,जामनेर | 9912 प्रति टन | 895/- |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता **तुरटी पुरवठयाकरीता सर्वात कमी दर डॉल्फीन केमिकल्स जळगाव यांचे प्रति टन 6299/- रु.प्रमाणे व पीएसी पावडर करीता बजाज जनरल स्टोअर्स चंद्रपुर यांचे दर 779/- प्रति बॅग 25 किलो आहे.**निवीदा उघडल्यानंतर कामाची निकड लक्षात घेता,मा.अध्यक्ष महोदय,यांच्या दिनांक 09/06/2021 च्या कार्योत्तर मंजूरीच्या आदेशानुसार डॉल्फीन केमिकल्स जळगाव 60 टन तुरटी व बजाज जनरल स्टोअर्स यांच्याकडून 100 बॅग पीएसी पावडर व 30 टन तुरटी पुरवठा आदेश देवून मागविण्यात आले आहे.सदर कार्योत्तर मंजूरीने केलेल्या खरेदीस व डॉल्फीन केमिकल्स जळगाव यांच्या तुरटी पुरवठयाच्या निवीदेस व बजाज जनरल स्टोअर्स चंद्रपुर यांच्या पीएसी पावडर पुरवठा करण्याच्या कमी दरांच्या निवीदेस ही सभा मान्यता देत आहे.

**काम क्र. 3 :- नगर परिषद निधी अंतर्गत सन 2021-2022 या आर्थीक वर्षाकरीता पाणी पुरवठा अंतर्गत विविध कामाकरीता कुशल-अकुशल कामगार पुरवठा करणे**

| अ. क्र. | निवीदा धारकाचे नाव | निवीदेत सादर केलेले दर (प्रति मजुर करीता) | |
|---|---|---|---|
| | | कुशल | अकुशल |
| 1 | सावित्रीबाई सेवा सहकारी संस्था धुळे | 521/- | 471.80/- |
| 2 | गाडगेबाबा स्वयंम सहकारी पुरुष बचत गट संस्था मलकापूर | 512/- | 493/- |
| 3 | श्री शिवानंद नारायण मुंडे बुलडाणा मजूर कामगार सहकारी संस्था | 530/- | 510/- |
| 4 | वैभव इंटरप्राईजेस बुलडाणा | 550/- | 525/- |

वरील तुलात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता कुशल मजूर पुरवठा करण्याकरीता गाडगेबाबा स्वयंम सहकारी पुरुष बचत गट संस्था मलकापूर यांचे सर्वात कमी दर प्रति मजूर रु.512/- प्राप्त झाले आहे.तसेच अकुशल मजूर पुरवठा करण्याकरीता सावित्रीबाई सेवा सहकारी संस्था धुळे यांचे सर्वात कमी दर प्रति मजूर 471.80/- प्राप्त झाले आहे.कमी दराच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.

**वृत्तपत्र वादळातील नौकासारखा समाजच्या दिनांक 03/05/2021 रोजी प्रसिध्द झालेल्याचार कामाच्या कोटेशन सुचनांनुसार खालील प्रमाणे कमी दराचे कोटेशन प्राप्त झालेले आहे.**



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

**काम क्र. 1** **पुर्णापनदीपात्रातील अशुध्द पाणी शुध्द करण्याकरीता POLYELECTRLYTE FLOCCULANT चा पुरवठा करणेबाबत (प्रति लिटरप्रमाणे दर सादर करणे)**

| अ.क्र. | कोटेशन धारकांचे नांव | कोटेशन सादर केलेले दर प्रति लिटरप्रमाणे |
|---|---|---|
| 1 | महालक्ष्मी केमिकल्स जळगाव | 420/- |
| 2 | डॉल्फीन केमिकल्स जळगाव | 480/- |
| 3 | धनीशा इंटरप्राईजेस केमिकल्स जळगाव | 690/- |

वरील तुलनात्मक तक्तांचे अवलोकन केले असता **महालक्ष्मी केमिकल्स जळगाव** यांचे दर सर्वात कमी म्हणजे 420/- प्रति लिटर प्रमाणे आहे.सदर जेलीचा वापर पुर्णा नदीपात्रातील गढूळ पाणी शुध्द करण्याकरीता आवश्यक असल्याने व येणाऱ्या पावसाळयाचे दिवस लक्षात घेता.मा.अध्यक्ष महोदय यांच्या कार्योत्तर मंजूरीनुसार सर्वात कमी दरांचे निवीदा धारक महालक्ष्मी केमिकल्स जळगाव यांच्या कडून 420 लिटर जेली मागविण्यात आली आहे.तरी कार्योत्तर मंजूरीने केलेल्या खरेदीस व कमी दरांच्या निवीदेस ही सभा मान्यता देत आहे.

**काम क्र. 2 :-** **धुपेश्वर पंपीग स्टेशन वरील VT पंपाकरीता SS मटेरीयलचे मेन SHAFT पुरवठा करणे (3 नग)**

| अ.क्र. | कोटेशन धारकांचे नांव | कोटेशन सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1 | गणेश मोल्डींग वर्क्स जळगाव | 92200/- |
| 2 | विरारी इंजीनअरींग वर्क्स जळगाव | 98400/- |
| 3 | सुपर प्लास्टोटेक्स जळगाव | 94300/- |

वरील तुलनात्मक तक्तांचे अवलोकन केले असता गणेश मोल्डींग वर्क्स जळगाव यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु.92200/- इतके आहे.कमी दरांच्या निवीदेस ही सभा मान्यता देत आहे.

**काम क्र. 3 :-** **रेल्वे स्टेशन व नांदुरा रोडवरील डिवायडर मधी झाडांना पाणी टाकणेकरीता 1000 लिटरचे टँकरचे दर सादर करणे**

| अ.क्र. | कोटेशन धारकांचे नांव | कोटेशन सादर केलेले दर प्रति 1000 लिटर टँकरकरीता |
|---|---|---|
| 1 | पवन अँक्वा मलकापूर प्रो.प्रा.बावस्कर | 270/- |
| 2 | सद्‌गुरु वॉटर सप्लायर्स मलकापूर प्रो.प्रा.संजय मंडवाले | 310/- |
| 3 | जय गंगामैया वाहतुक जलसेवा मलकापूर प्रो.प्रा.निलेश चोपडे | 235/- |

वरील तुलनात्मक तक्तांचे अवलोकन केले असता जय गंगामैया वाहतूक जलसेवा मलकापूर प्रो.प्रा.निलेश चोपडे यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु.235 आहे.कामाची निकड लक्षात घेता मा.अध्यक्ष महोदय यांच्या कार्योत्तर मंजूरीनुसार दिनांक 13/05/2021 पासून सर्वात कमी दरांचे निवीदाधारक **जय गंगामैया वाहतुक जलसेवा मलकापूर प्रो.प्रा.निलेश चोपडे** यांना नांदुरा रोड व रेल्वे स्टेशन रोड वरील झाडांना पाणी टाकणेबाबत आदेश देण्यात आला होता.त्यानुसार निलेश चोपडे दिनांक13/05/2021 ते दिनांक 30/06/2021 या कालावधीत एकूण 329 टँकर ट्रिपद्वारे डिवायडर मधील झाडांना पाणी टाकलेले आहे.सदर कार्योत्तर मंजूरीने केलेल्या कामास व कोटेशन कमी दरास ही सभा मान्यता देत आहे.

**काम क्र. 4 :-** **धुपेश्वर पंपीग स्टेशनवरील डीपीकरीता 11 K.V. विद्युत व्यवस्थेकरीता AB Switch Set Complete पुरवठा करणे व फिटींग करणे.**

| अ.क्र. | कोटेशन धारकांचे नांव | कोटेशन सादर केलेले दर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | एम.एस.साई प्रकाश इलेक्ट्रीकल,बुलडाणा | 50,740/- |
| 2 | निखील इलेक्ट्रीकल मलकापूर | 55,000/- |
| 3 | प्रभात इलेक्ट्रीकल मलकापूर | 53,100/- |

वरील तुलनात्मक तक्तांचे अवलोकन केले असता एम.एस.साई प्रकाश इलेक्ट्रीकल,बुलडाणा यांचे दर सर्वात कमी म्हणजे 50,740/- आहे.कमी दराच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.

**पाणी पुरवठा विभागाकरीता दैनिक हिंदुस्थान दिनांक 26/06/2021 या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या दोन कामांच्या कमी दरांच्या ई-निवीदांना मंजूरी मिळणे**

काम क्र. :- 1 मलकापूर पाणी पुरवठा योजने अंतर्गत हापंप दुरुस्तीकरीता लागणारे साहित्य पुरवठा करणे.

| अ.क्र. | साहित्यांचे नांव | प्रति नग | श्री सप्लायर्स बुलडाणा | राजधानी सप्लायर्स | श्री.इरिगेशन ॲन्ड ईलेक्ट्रीकल्स | किशोर ट्रेडर्स |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | I.S.I मार्क हॅन्ड पंम्प कम्पलेट,टेलेस्कोपी स्टॅड,वॉटर टॅकसह 12 GIपाईप,12 कनेक्टींग रॉड | 1प्रति नग | 50,000/- | 49,000/- | 48,700/- | 11,865 |
| 2 | हॅन्डल | 1प्रति नग | 2050/- | 2000/- | 1980/- | 1975/- |
| 3 | बेअरींग 6204 | 1प्रति नग | 260/- | 250/- | 230/- | 165/- |
| 4 | सिलेंडर | 1प्रति नग | 5000/- | 4950/- | 4900/- | 1895/- |
| 5 | हॅन्डल | 1प्रति नग | 2050/- | 2000/- | 1980/- | 1975/- |
| 6 | बेअरिंग 6204 | 1प्रति नग | 260/- | 250/- | 230/- | 165/- |
| 7 | सिलेंडर | 1प्रति नग | 5000/- | 4950/- | 4900/- | 1895/- |
| 8 | अप्पर वॉल असेंबली | 1प्रति नग | 850/- | 830/- | 820/- | 825/- |
| 9 | लोअर वॉल असेंबली | 1प्रति नग | 670/- | 660/- | 650/- | 799/- |
| 10 | चैन | 1प्रति नग | 420/- | 400/- | 380/- | 169/- |
| 11 | रॉड कपलींग | 1प्रति नग | 115/- | 110/- | 105/- | 134/- |
| 12 | एक्सल | 1प्रति नग | 175/- | 170/- | 165/- | 192/- |
| 13 | वॉटर टॅक | 1प्रति नग | 1750/- | 1700/- | 1610/- | 1919/- |
| 14 | 12mmकनेक्टींग रॉड (3mEach) | 1प्रति नग | 590/- | 580/- | 575/- | 340/- |
| 15 | 32 mm GI पाईप B class 3mtr length both side and one copling | 1प्रति नग | 1920/- | 1900/- | 1890/- | 1290/- |
| 16 | Telescopic Stand | 1प्रति नग | 7100/- | 7050/- | 7010/- | 3655/- |
| 17 | Thrust Plate | 1प्रति नग | 915/- | 910/- | 900/- | 625/- |
| 18 | पाईप कपलींग | 1प्रति नग | 290/- | 285/- | 280/- | 110/- |
| 19 | रेडयुसर कॅप | 1प्रति नग | 275/- | 250/- | 240/- | 185/- |
| 20 | 32mm जीआय सॉकेट | 1प्रति नग | 300/- | 290/- | 285/- | 190/- |
| 21 | Cup Washer | (Per Dozen) | 475/- | 450/- | 430/- | 240/- |
| 22 | Rubber Ring bucket washer | (Per | 425/- | 400/- | 390/- | 450/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Dozen) | | | | |
| 23 | नटबोल्ट | प्रति किलो | 310/- | 300/- | 290/- | 180/- |
| 24 | स्लीव्ह | 1प्रति नग | 830/- | 820/- | 800/- | 430/- |
| 25 | लोअर वॉल वायशर | (Per Dozen) | 425/- | 410/- | 400/- | 290/- |
| | एकूण | | 75,145/- | 73,715/- | 73,030/- | 27,923/- |

वरील तुलनात्मक तक्ताचे अवलोकन केले असता हातपंप साहित्य पुरवठयांचे सर्वात कमी दर किशोर ट्रेडर्स (एकूण साहित्याचे प्राप्त दर 27,923/-)यांचे प्राप्त झाले आहे.कमी दराच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.

**काम क्र.:-2** **मलकापूर पाणी पुरवठा योजनेच्या वितरण नलीकेवरील लिकेंज दुरुस्तीचे काम करण्याकरीता लागणारे साहित्य,एअर व्हॉल इत्यादि साहित्य पुरवठा करणे.**

| अ.क्र. | साहित्यांचे नांव | प्रति नग | श्री सप्लायर्स बुलडाणा | राजधानी सप्लायर्स | श्री.इरिगेशन अॅन्ड ईलेक्ट्रीकल्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पीव्हीसी पाईप 4kg/cm2 (1 pipe 20 ft long) | 1प्रति नग | | | |
| 2 | 90mm | 1प्रति नग | 1300/- | 1280/- | 1260/- |
| 3 | 110mm | 1प्रति नग | 1900/- | 1870/- | 1850/- |
| 4 | 160mm | 1प्रति नग | 3750/- | 3700/- | 3650/- |
| 5 | 200 mm | 1प्रति नग | 4750/- | 4700/- | 4690/- |
| 6 | 250 mm | 1प्रति नग | 8400/- | 8300/- | 8250/- |
| | PVC Pipes 46kg/cm2 (1 pipe 20 ft long) | | | | |
| 7 | 90 mm | 1प्रति नग | 1480/- | 1470/- | 1450/- |
| 8 | 110mm | 1प्रति नग | 2050/- | 2010/- | 2000/- |
| 9 | 160mm | 1प्रति नग | 4170/- | 4150/- | 4100/- |
| 10 | 200mm | 1प्रति नग | 5420/- | 5400/- | 5300/- |
| 11 | 250mm | 1प्रति नग | 9350/- | 9300/- | 9270/- |
| | Mechanical Joints | Per No | | | |
| 12 | 90 mm | Per No | 1200/- | 1170/- | 1150/- |
| 13 | 110mm | Per No | 1700/- | 1680/- | 1650/- |
| 14 | 160mm | Per No | 3020/- | 3000/- | 2980/- |
| 15 | 200mm | Per No | 4050/- | 4000/- | 3950/- |
| 16 | 250mm | Per No | 6650/- | 6600/- | 6500/- |
| | Double Flang Sluice valve-PN-1.6without byepass arrangement | | | | |
| 17 | 100mm | Per No | 11000/- | 10800/- | 10626/- |
| 18 | 150mm | Per No | 14500/- | 14200/- | 14100/- |
| 19 | 200mm | Per No | 27600/- | 27500/- | 27425/- |



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | 250mm | Per No | 44000/- | 43500/- | 43000/- |
| 21 | 300mm | Per No | 54500/- | 54000/- | 53900/- |
| 22 | 350mm | Per No | 83200/- | 83000/- | 82000/- |
| 23 | Kinetic Air Valve 80mm Per No | Per No | 20,500/- | 20,000/- | 19,990/- |
| 24 | Air Valve Ball 80mm per No | Per No | 420/- | 400/- | 380/- |
| 25 | Air Valve Ball 100mm per No | Per No | 630/- | 620/- | 610/- |
| | M.S. Flange | | | | |
| 26 | 80 mm | Per No | 830/- | 820/- | 800/- |
| 27 | 100 mm | Per No | 930/- | 920/- | 910/- |
| 28 | 150 mm | Per No | 1160/- | 1150/- | 1105/- |
| 29 | 180 mm | Per No | 1450/- | 1420/- | 1410/- |
| 30 | 250 mm | Per No | 1720/- | 1700/- | 1690/- |
| 31 | 300 mm | Per No | 2080/- | 2050/- | 2010/- |
| 32 | 350 mm | Per No | 3160/- | 3150/- | 3120/- |
| 33 | 90 mm | Per No | 225/- | 220/- | 210/- |
| 34 | 110 mm | Per No | 275/- | 270/- | 265/- |
| 35 | 160 mm | Per No | 575/- | 570/- | 560/- |
| 36 | 200 mm | Per No | 1000/- | 980/- | 970/- |
| 37 | 250 mm | Per No | 1470/- | 1460/- | 1455/- |
| | PVC Coupling 4kg/cm2 | | | | |
| 38 | 90 mm | Per No | 185/- | 180/- | 175/- |
| 39 | 110 mm | Per No | 310/- | 300/- | 290/- |
| 40 | 160 mm | Per No | 715/- | 710/- | 705/- |
| 41 | 200 mm | Per No | 1200/- | 1180/- | 1175/- |
| 42 | 250 mm | Per No | 1910/- | 1900/- | 1890/- |
| | PVC Tee 4kg/cm2 | | | | |
| 43 | 90 mm | Per No | 385/- | 380/- | 370/- |
| 44 | 110 mm | Per No | 685/- | 680/- | 670/- |
| 45 | 160 mm | Per No | 1710/- | 1700/- | 1615/- |
| 46 | 200 mm | Per No | 3650/- | 3600/- | 3525/- |
| 47 | 250 mm | Per No | 5570/- | 5560/- | 5540/- |
| | PVC Reducer 4kh/cm2 | | | | |
| 48 | 90 mm | Per No | 315/- | 310/- | 300/- |
| 49 | 110 mm | Per No | 525/- | 520/- | 500/- |
| 50 | 160 mm | Per No | 880/- | 870/- | 850/- |
| 51 | 200 mm | Per No | 2650/- | 2620/- | 2600/- |
| 52 | 250 mm | Per No | 3610/- | 3600/- | 3550/- |



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Packing Russi (Per kg) | | | | |
| 53 | 8 mm | (Per kg) | 1180/- | 1170/- | 1150/- |
| 54 | 10 mm | (Per kg) | 1190/- | 1180/- | 1170/- |
| 55 | 12 mm | (Per kg) | 1080/- | 1070/- | 1050/- |
| 56 | Solution Per lit | Per lit | 210/- | 205/- | 200/- |
| 57 | Black Rubber sheer (Per kg) | Per kg | 425/- | 420/- | 410/- |
| 58 | Nut bolts (per kg) | Per kg | 270/- | 260/- | 240/- |
| 59 | Hacksaw blade (per No) | Per No | 70/- | 65/- | 60/- |
| | Total | | 3,59,140/- | 3,55,840,/- | 3,52,621/- |

वरील तुलनात्मक तक्ताचे अवलोकन केले असता लिकेज दुरुस्तीकरीता साहित्य पुरवठयाचे सर्वात कमी दर **श्री इंरीगेशन अॅड इलेक्ट्रीकल मलकापूर** (एकूण साहित्याचे प्राप्त दर रु.35,621/-) यांचे प्राप्त झाले आहे कमी दराच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.

वरील पाणी पुरवठा विभागा अंतर्गत प्रसिध्द निविदा सूचने नुसार कमी दराच्या सर्व निविदांना व या करिता येणाऱ्या खर्चास व सदरचे काम न.प.निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक-अनिल शिवरतन गांधी

अनुमोदक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

टराव सर्वानुमते मंजूर

12. **मलकापूर ते धुपेश्वर जूनी 400 एमएम व्यासाची पाईप लाईन खालील सिमेंट चेअरच्या लिलावाच्या कामाकरीता श्री.संजय रामदास सरदार यांनी लिलावापोटी जमा केलेली रक्कम परत करण्यावाबत निर्णय घेणे.**

मलकापूर ते धुपेश्वर जूनी 400 एमएम व्यासाची पाईप लाईन खालील सिमेंट चेअरच्या लिलावाच्या कामाकरीता श्री.संजय रामदास सरदार यांनी लिलावापोटी जमा केलेली रक्कम परत करण्यावाबतचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेत श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर,मो.जाकीर मो.ईलियास व श्री अनिल शिवरतन गांधी यांनी सहभाग घेतला

टरविण्यात येते की,मलकापूर धुपेश्वर जूनी 400 एमएम व्यासाची पाईप लाईन खालील सिमेंट चेअरच्या लिलावाकरीता श्री.संजय रामदास सरदार यांनी सर्वात जास्त रु.2,11,000/- इतकी रक्कम (लिलावाची किंमत 68,000/-) सादर केली होती.त्यानुसार त्यांनी रु.2,11,000/- इतकी रक्कम रोखीने रोखपाल यांच्याकडे जमा केली आहे.परंतू त्यांनी विषयांकित कामाचा कार्यादेश स्वीकारला नाही.

निवीदाधारक श्री.संजय रामदास सरदार यांनी दिनांक 08/07/2021 रोजी वैदयकीय कारणास्तव सदर काम करणे शक्य नसल्याचे कार्यालयास कळविले आहे.तसेच त्यांनी निवीदेपोटी भरलेली रक्कम 2,11,000/- परत करण्यावाबत कार्यालयास विनंती केली आहे.असा अहवाल पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेला आहे. सदर प्रकरणात धर्मदास इंगळे यांची लेखी तक्रार प्राप्त झालेली आहे असे मुख्याधिकारी यांनी सभेत सांगितले चर्चेत श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर,मो.जाकीर मो.ईलियास व श्री अनिल शिवरतन गांधी यांनी सहभाग होतांना सदर प्रकरणा जिल्हा प्रशासन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे असे सभेत सांगितले.



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

वरील सर्व बाबी विचारात घेवूनमलकापूर ते धुपेश्वर जूनी 400 एमएम व्यासाची पाईप लाईन खालील सिमेंट चेअरच्या लिलावाच्या कामाकरीता श्री.संजय रामदास सरदार यांनी लिलावापोटी जमा केलेली रक्कम परत करण्याबाबतचे प्रकरणात जिल्हा प्रशासन अधिकारी.जिल्हाधिकारी कार्यालय,बुलढाणा यांचे कडे मार्गदर्शन घेवून त्यांचे मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

सूचक-मो.जाकीर मो.ईलियास

अनुमोदक-राजेंद्र वसंतराव वाडेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

13. **दैनिक लोकशाही दिनांक 05/08/2021(द्वितीय वेळ) मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा सुचनेनुसार आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणे.**

प्रसिध्द निविदेसूचने नुसार आलेल्या दरपत्रकांना मान्यता देणेचे प्रकरण व विषयासंबंधीची टिप्पणी सभेसमोर सादर करण्यात आली त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली नगर अभियंता बांधकाम यांनी विषय क्रं.13 दैनिक लोकशाही ऐवजी दै.विर्दभ मतदार मध्ये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली असल्याचे व सदर चूक नजरचुकीने झाली असल्याचे सभेत सांगितले. त्यानुसार दुरुस्ती करण्यास सभेने मान्यता दिली.

ठरविण्यात येते की, तातडीची विशेष सभा ठराव क्र.1 दिनांक 01/02/2019 नुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरि दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करावयाच्या कामाकरीता सुभाषचंद्र बोस वार्डात जीर्ण झालेल्या बालकमंदीराचे जागेवर सर्वसोईयुक्त सभागृह बांधणे करीता सभेने मंजूरात प्रदान केली आहे.सदर बालक मंदीर जीर्ण झाले असून स्ट्रकचरल ऑडीट करुन मिळणेकरीता मा.उपविभागीय अभियंता यांना न.प.पत्र क्र.मनप/बांधवि/3631/2019 दिनांक 16/12/2019 व मा.कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग खामगाव यांना पत्र क्र.मनप/193/2020 दिनांक 15/1/2020 नुसार पत्राद्वारे विनंती करण्यात आली होती.यांचे पत्र क्र.118/ता/2020 दिनांक 05/02/2020 नुसार त्यांनी असे नमूद केले की, अवलोकनानंतर ही इमारत पूर्णत: शिकस्त झालेली असून पूर्णत: मोडकळीस आलेली असून या ठिकाणी वास्तव्य करणे अत्यंत धोकादायक असल्याचे नमूद केले असून त्याबाबतचे मुल्यांकन निव्वळ रक्कम रुपये 20,250/- काढून देण्यात आले आहे.त्यानुसार पुढील कार्यवाहीस शिकस्त इमारत काढून घेणेबाबत ठेकेदारांकडून निवीदा प्रक्रिया करुन घ्यावी लागेल.त्याकरीता दै.पेपरमध्ये जाहीर निवीदा प्रक्रिया करुन घ्यावी लागेल.त्याकरीता दै.पेपरमध्ये जाहीर निवीदा सुचना प्रसिध्द करावी लागेल.

त्यानुसार दै.लोकशाही दिनांक 08/04/2021 च्या अंकात प्रसिध्द करण्यात आली होती.दिनांक 24/04/2021 पर्यत विहित मुदतीत निविदा प्राप्त झाल्या नाहीत.परंतू कामाची निकड बघुन फेर जाहीरात दै.वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करावी लागेल असे नगर अभियंता यांनी मुख्याधिकारी न.प.मलकापूर यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे.त्यानुसार दिनांक 05/08/2021 रोजी दै.विदर्भ मतदार या अंकात सदर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दै.विदर्भ मतदार दिनांक 05/08/2021 मध्ये प्रसिध्द झालेल्या निवीदा सुचनानुसार विहित मुदतीत खालील प्रमाणे तिन दरपत्रक प्राप्त झाले आहे.

| **कामाचे नाव :- शिवाजी नगर प्रभाग क्र.2 मधील जीर्ण झालेल्या समाजमंदीर/सभागृह पाडून इमला घेऊन जाणे.** | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दर |
| 1 | विजय सालवाणी | 20,500/- |
| 2 | काद्री ख्वाजा वाजीद माईनउल्लाखाँ | 20,700/- |
| 3 | मुरताकखान जब्बार खान | 20,000/- |



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA

वरील प्राप्त दरापैकी सर्वात जास्त दर अनु.क्र.2 काद्री ख्वाजा वाजीद मोईनउल्ला यांचे असल्याचा अहवाल लेखापाल,लेखापरिक्षक व नगर अभियंता यांनी सादर केलेला आहे जास्त दराच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक- श्री.राजेंद्र वसंतराव वाडेकर

अनुमोदक-मो.जाकीर मो.ईलियास

टराव सर्वानुमते मंजूर

सभेतील विषय क्रं.1 ते 13 चे कामकाज पूर्ण झाल्याने मा.सभापती यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

(रशिदखाँ युसूफखाँ जमादार)
सभापती,
स्थायी समिती,
नगर परिषद,मलकापूर



REDMI NOTE 9
AI QUAD CAMERA